www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , अलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
संपर्क 9220403509 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 259 वा मंगळवार दि. 03 जून २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

**ठिकाण: माणगाव तालुका, निजामपूर रोड, माणगाव नगरपंचायत हद्दीतील कचऱ्याचे साम्राज्य**



पत्रकार: संदेश बांदल
प्रतिनिधी, दैनिक युवक आधार.

**आवाज पोहोचवतो – युवक आधार**
**माणगाव तालुका प्रतिनिधी संदेश बांदल."**

**"कचऱ्याचा डोंगर, लोकांच्या आरोग्याला धोका – माणगाव नगरपंचायतीच्या दुर्लक्षामुळे नागरिक त्रस्त!**

# लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या ११ व्या पुण्यस्मरणानिमित्त कळंबोली मध्ये

## विविध कार्यक्रमाचे आयोजन



**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**
**संपादक**

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या अकराव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त कळंबोली मधील सेक्टर 4 येथे स्वामी समर्थ मंदिरामध्ये सकाळी प्रतिमा पूजन , सकाळी १०.०० ते दुपारी ४.००वाजेपर्यंत रक्तदान शिबिर त्यानंतर ह. भ. प .आदिनाथ महाराज लाड आळंदी देवाची यांचे हरिकीर्तन होईल व त्यानंतर नऊ ते दहा महाप्रसाद होईल . या कार्यक्रमास सर्व पनवेल तालुक्यातील मुंडे साहेब प्रेमींनी उपस्थित राहावे असे आवाहन जय भगवान युवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे . या कार्यक्रमास लोकनेते रामशेठ ठाकूर आमदार प्रशांत ठाकूर आमदार विक्रांत पाटील प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे सर्व नगरसेवक नगरसेविका तसेच कळंबोलीतील सर्व समाजसेवक उपस्थित राहणार आहेत . रक्तदान शिबिरास जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजकार्यात आपला हातभार लावावा असे आवाहन भाजप नेते बबन बारगजे यांनी केले आहे .

# महिलेच्या हातातील मोबाईल हिसकावून चोरटे झाले पसार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**: रस्ता ओलांडत असताना मोटरसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी ४६ वर्षीय महिलेच्या हातातील ८८ हजार रुपयांचा मोबाईल हिसकावून पलायन केले. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मीनल खंदारे या कामोठे येथे राहतात. त्या कामोठे सेक्टर २० मधील मार्केटमध्ये गेल्या होत्या. खांदेश्वर रेल्वे स्टेशनकडे जाण्यासाठी त्या आणि त्यांची बहीण सेंट्रल बँकेसमोरील रस्ता ओलांडत असताना नंबर प्लेट नसलेल्या मोटरसायकलवरून दोघे आले आणि एकाने खंदारे यांच्या हातातील मोबाईल हिसकावला आणि ते खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या दिशेने पळून गेले.

# पनवेल तालुक्यातील १३ अनधिकृत शाळांना नोटिसा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

विनापरवानगी सुरू केलेल्या १३ शाळा बंद कराव्यात यासाठी पनवेल पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने नोटिसा बजावल्या आहेत. पनवेल तालुक्यात १३ शाळा अनधिकृत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कारवाई आणि दंडाच्या नोटिसा पंचायत समितीने बजावल्या आहेत. पनवेल तालुक्यात अनेक अनधिकृत शाळा कित्येक वर्षांपासून सुरू आहेत. दरवर्षी त्यांच्यावर नोटीस बजावण्याशिवाय कोणतीही कारवाई केली जात नाही. अशा अनधिकृत शाळांवर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे गरजेचे आहे. मात्र नोटीसा देऊन त्यांची सुटका केली जाते. तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कुल (नेरे), किड्स गार्डन पब्लिक स्कूल (टेमघर), एस.जी.टी. इंटरनॅशनल (करंजाडे, आर 1), साईगणेश एज्युकेशन सोसायटी नवजीवन इंटरनॅशनल स्कूल (खारपाडा), वेदिक ट्री इंटरनॅशनल स्कूल (करंजाडे सेक्टर ३), वेदगृह इंटरनॅशनल स्कूल (करंजाडे सेक्टर ४), दि बुद्धिष्ट इंटरनॅशनल स्कूल (ओवळे), सनराईस इंग्लिश स्कूल (वावंजे), दि बुद्धिष्ट इंटरनॅशनल स्कूल (आर 1, करंजाडे), कै. मंजुळा त्रिंबक (साखरेशेठ) ठाकूर इंग्रजी माध्यम शाळा (पाले बुदुक कोळवाडी), ज्ञानाई माध्यमिक विद्यालय (धामणी–वाजे), न्यू इंग्लिश स्कूल (कोपरा), आशाप्रभा न्यू इंग्लिश स्कूल (विचुंबे) या शाळांना सरकारची मान्यता नाही. त्यामुळे या शाळा अनधिकृत असल्याचे पनवेल पंचायत समितीने जाहीर केले आहे. शिक्षण विभागाने पाठवलेल्या नोटिसीमध्ये अनधिकृत शाळा बंद कराव्यात तसेच नवीन वर्षी या शाळा सुरू करू नयेत आणि विद्यार्थ्यांना बाजूच्या शाळेमध्ये समायोजित करावे तसेच शाळेला सूचना देऊन ही शाळा बंद न केल्यास शाळा व्यवस्थापनास एक लाखाचा दंड किंवा प्रत्येक दिवसाला १० हजार रुपये दंड ठोठावण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे.

# शिवसेना वाशीम जिल्हा प्रमुख सुरेश भाऊ मापारी व मंगरुळपीर तालुका प्रमुख रामदास पाटील सुर्वे यांच्या संयुक्त वाढदिवसानिमित्त भोलेनाथ वृद्धाश्रम (वनोजा फाटा) येथे आबाल वृद्धानां ब्लॅकेट वाटप.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

मंगरुळपीर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे तालुका वतीने वाशीम जिल्हा प्रमुख तथा मा. अर्थ व बांधकाम सभापती जी. प. वाशीम चे सुरेश भाऊ मापारी तथा मंगरुळपीर तालुका प्रमुख रामदास पाटील सुर्वे यांचे हस्ते भोले नाथ वृद्धाश्रम वनोजा येथे संयुक्त वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा निमित्त सामाजिक उपक्रम म्हणून येथील वृद्धाश्रमात जाऊन आबाल वृद्धाना उलन ब्ल्यानकेट वाटप करण्यात आले. तसेच श्री गजानन महाराज संस्थान वनोजा फाटा तथा आदर्श ग्रामपंचायत वनोजा वतीने मान्यवरांचा शाल व श्री फळ तथा पुष्पगुछ देऊन भावपुर्ण सत्कार करण्यात आला.या प्रसंगी श्री गजानन महाराज संस्थान चे सदानंद राऊत छत्रपती शाहू महाराज संस्थान चे डॉ. भालचंद्र राऊत सरपंच डॉ. श्रीराम



मुखमाले, तालुका मार्गदर्शक अशोकराव हांडे सरआरोग्य जिल्हा प्रमुख शिवा सावके तालुका संघटक बबनराव सावके,डॉ. सुनील राऊत, मा जी प सदस्य सचिनभाऊ डोफेकर प स सदस्य विलास लांबाडे प्रा. पवन राऊत , सामाजिक कार्यकर्ते गंगादीप पाटील उप सरपंच मारोती इंगोले सेवा सहकारी सो. वनोजा सभापती अविनाश राऊत,मा तंटामुक्ती अध्यक्ष रामेश्वर राऊत, दादा राऊत गुरुजी,मा सरपंच राजेश पाटील ग्रामपंचायत सदस्य नंदकिशोर गावंडे, मोहन पानभरे,शाखा प्रमुख गोवर्धन पाटील, संजय तिरकेपंकज येवले, रवी लोंधे,गणेश देशमुखसचिन राऊत, कुलदीप इंगोले, अनिकेत राऊत, शुभम राऊत दिलीप उपाध्ये, एस के काळे,,अशोक खंडारे अमोल ठाकरे, बाळकृष्ण रोकडे, गणेश राऊतशेंदुरजूना येथील खांडुजी साहेब दिलीप राऊत पाटील संजय इंगोले, मा. प स सदस्य राजू भाऊ भगत, जगन्नाथ इंगोले, प्रभू भाऊ इंगोले,मा उप सरपंच प्रकाश इंगोले,गजानन इंगोले सर्कल प्रमुख देविदास जाधव त्यांचे सर्व पदाधिकारी नरेंद्र येवले, रामा भाऊ राठोड, चंद्रकांत जायेभाये, मुकिंद जी जायेभाये,प्रल्हाद राठोड, कैलास राठोडभोलेनाथ वृद्धाश्रमचे मोरश्वर राऊत तथा भोलेनाथ महाराज यांचा मान्यवर चे हस्ते भाव पूर्ण सत्कार करण्यात आला.यावेळी विविध संस्थान चे पदाधिकारी तथा सर्व चाहता वर्ग, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सर्व तालुका पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते.

# पोलीस पाटील आयु.कुणाल लोंढे यांची रायगड जिल्हा सचिव पदी पुन्हा निवड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

करंजाडे येथील पोलीस पाटील आयु.कुणाल लोंढे यांची रायगड जिल्हा सचिव पदी पुन्हा निवड झाली आहे. रायगड जिल्हा पोलीस पाटील संघाची बैठक अलिबाग येथे राज्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ बाळासाहेब शिंदे पाटील यांच्या उपस्थितीत सर्वांच्या रायगड जिल्हा पोलीस पाटील संघांची कार्यकारिणीची निवड करण्यात आली यावेळी रायगड जिल्हा सचिव पदी दुसऱ्यादा आयु.कुणाल लोंढे करंजाडे पोलीस पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. याबाबदल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



# पनवेल महानगरपालिकेत 'लोकशाही दिन' संपन्न

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये दिनांक 02 जून रोजी आयुक्त श मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले. आजच्या बैठकित नागरी सेवा सुविधा, बांधकाम विभाग अशा विविध विभागाचे पाच अर्ज दाखल झाले होते, यावेळी नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या. या कार्यक्रमास परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे ,उपायुक्त सर्वश्री, डॉ.वैभव विधाते, स्वरूप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे,सहाय्यक आयुक्त सर्वश्री श्रीराम पवार , सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, विभाग प्रमुख,अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे.

# दीपक फर्टिलायझर्सचे अध्यक्ष शैलेश सी. मेहता यांची फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडियाच्या अध्यक्षपदी निवड

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

सार्वजनिक क्षेत्र, संयुक्तक्षेत्र आणि खाजगी क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश असलेल्या देशातील खत उद्योगाचे प्रतिनिधीत्व करणारी कंपनी फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडिया (एफएआय)ने दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड आणि महाधन ॲग्रीटेक लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक शैलेश सी. मेहता यांची नवीन अध्यक्ष म्हणून निवड केली. उद्योगात चार दशकांहून अधिककाळ अनुभव असलेले श्री. मेहता यांनी पाच वर्षांहून अधिककाळ फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडिया (वेस्टर्न रिजियन)चे अध्यक्ष म्हणून देखील काम केले. खत उद्योगाने गेल्या दोन दशकांत भारताच्या कृषी विकास उत्पादनात ६० टक्के आणि फलोत्पादन उत्पादनात ४० टक्के वाढ करण्यात महत्त्वाची भूमिका



बजावली आहे. हा उद्योग जागतिक स्तरावरील सर्वोत्तम उत्पादनांमध्ये त्याच्या कार्यक्षमतेचे मापदंड स्थापित करतो आणि लाखो भारतीय शेतकऱ्यांना अनुदानित खतांचा प्रभावीपणे पुरवठा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. याप्रसंगी मत व्यक्त करत श्री. मेहता म्हणाले, "अन्न टंचाई पासून जागतिक कृषी निर्यातदारापर्यंतचा भारताचा प्रवास उल्लेखनीय राहिला आहे. या प्रवासात खत उद्योग महत्त्वाची भूमिका बजावत आहे, आता शाश्वत विकासाला पाठिंबा देणाऱ्या अधिक संतुलित आणि पोषक खतांवर लक्ष केंद्रित केले आहे. सरकार, उद्योग आणि आपल्या शेतकऱ्यांमध्ये दुआ म्हणून काम करण्याचा मला खरोखर अभिमान आहे, जेथे जागतिक स्तरावर भारतीय शेतकरी आणि शेती उत्पादकता वाढवण्यासाठी उत्प्रेरक म्हणून काम करेन" असेही शैलेश मेहता यांनी या निवडीबद्दल मत व्यक्त करताना आश्वासित केले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

द्वारकाशारदापीठाधीश्वर जगद्गुरू शंकराचार्य स्वामिश्री सदानंद सरस्वती महाराज यांनी स्वतः उपस्थित राहून लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कुटुंबाला दिले आशीर्वाद विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिष्टचिंतन, समाजोपयोगी उपक्रमांची रेलचेल पनवेल (हरेश साठे) दानशूर व्यक्तिमत्त्व, माजी खासदार आणि समाजाच्या हृदयात अधिराज्य गाजवणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज वयाची ७४ वर्षे पूर्ण करत ७५ व्या वर्षात अर्थात अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले. या विशेष प्रसंगी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, अध्यात्मिक, साहित्य, वैद्यकीय, सांस्कृतिक, विधी, कला, सांस्कृतिक, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील हजारो मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्यांचे अभिष्टचिंतन करून दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे द्वारकाशारदापीठाधीश्वर जगद्गुरू शंकराचार्य स्वामिश्री सदानंद सरस्वती महाराज यांनी स्वतः उपस्थित राहून लोकनेते रामशेठ ठाकूर यांना तसेच त्यांच्या कुटुंबाला आशीर्वाद दिले. यावेळी अनेक मान्यवरांनी "लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस म्हणजे समाजाचा वाढदिवस" असे गौरवोद्गार काढले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, राजकीय, सांस्कृतिक, साहित्य, क्षेत्रातील योगदान अनन्य साधारण आहे. राजकीय व आर्थिक शक्ती लोक कल्याणासाठी सार्थकी लावणारा नेता म्हणून त्यांची ओळख नेहमीच अधोरेखित झाली असून त्यांचा माणसावर अधिक विश्वास आहे. त्याचबरोबर सामान्य माणसाला काय हवे याची जाणीव त्यांना कायम राहिली. स्वतःच्या खिशातून जास्तीत जास्त मदतीचा हात देण्याचा प्रयत्न त्यांनी कायम ठेवला आहे. वयाच्या ७५ वर्षीही त्यांचे सामाजिक कार्य अखंडपणे सुरूच आहे त्यामुळे सर्व क्षेत्रात आणि तळागाळातही त्यांच्या विचारांचा पगडा कायम आहे. विविध क्षेत्रातील योगदान आणि दानशूरता यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांना समाजाने "लोकमान्य लोकनेता" अशी उपाधी बहाल केली आहे. त्यांचा आदर्श घेऊन हजारो जणांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. सामान्य माणूस त्यांचा केंद्रबिंदू राहिला आहे, त्यामुळे प्रत्येक माणसाच्या मनात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घर केले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जात, पात, धर्म, पक्ष असा कधीही भेदभाव मानला नाही. आपल्याकडून जेवढी मदत करता येईल तेवढी करायची आणि त्यामुळे माणुसकी हाच त्यांचा धर्म कायम राहिला आहे. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांची लोकांप्रती असलेली त्यांची समर्पण भावना खऱ्या अर्थाने सुवर्ण अक्षराचे पान आहे. त्यांची कीर्ती महान आणि सर्व समाजाला मार्गदर्शक आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे आधारवड असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी हितचिंतकांची हजारोंच्या संख्येत अर्थात अफाट गर्दी होती. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव समितीच्यावतीने पनवेलमध्ये तीन दिवसीय भव्य 'अमृतमयी कीर्तन महोत्सव' आयोजित करण्यात आला होता. भजन, कीर्तन, सामुदायिक हरिपाठ, गुरुतुल्य कीर्तनकार महाराजांचा सन्मान समारंभपूर्वक करण्यात आला. या महोत्सवाला वारकरी संप्रदायातील हजारोंच्या संख्येने मंडळी उपस्थित राहिली तर दहा हजारहून अधिक भाविकांनी या कीर्तन महोत्सवाचा लाभ घेतला. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय नाट्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय नाट्य महोत्सव आयोजित करण्यात आला. तसेच रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन आणि योनेक्स सनराइज् यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा बॅडमिंटन चॅम्पियनशिप आणि निवड चाचणी स्पर्धा घेण्यात आली. कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्यावतीने 'एक कृतार्थ संध्याकाळ' या साहित्यिक कार्यक्रमांतर्गत कवी संमेलन परिसंवाद,सन्मान पुरस्कार सोहळा, रायगड जिल्हा युवा मोर्चाच्यावतीने वर्षभर रक्तदान शिबिर उपक्रम आयोजित करण्यात असून या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील रक्ततुटवडा भरून काढण्यासाठी हा एक विशेष "रक्तदान उपक्रम" हाती घेण्यात आला असून विविध विभागात वृक्षारोपण, आरोग्य शिबीरेही आयोजित करण्यात आले, अशाप्रकारे विविध समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

# महेंद्रशेठ घरत यांचा वाढदिवस गुणवंतांच्या साक्षीने उत्साहात साजरा.

मान्यवरांच्या हस्ते `सुखकर्ता' विशेष अंकांचे प्रकाशन.



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांचा ५८ वा वाढदिवस गुणवंतांच्या साक्षीने व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महेंद्रशेठ घरत यांच्या जीवनकार्यावर आधारित `सुखकर्ता' हा छोटेखानी विशेषांक प्रकाशित करण्यात आला. यावेळी दहावी आणि बारावीच्या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रांतील हजारो मान्यवर महेंद्रशेठ घरत यांना शुभेच्छा देण्यासाठी आले होते. यावेळी नवी मुंबई इंटक अध्यक्ष रवींद्र सावंत, दिबांचे पुत्र अतुल पाटील, पनवेल महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश ठाकूर, ओबीसी सेल प्रदेश अध्यक्ष भानुदास माळी,उद्योजक राम म्हात्रे, उद्योजक सुनील म्हसकर, डॉ. दिपाली गोडघाटे, अड. रेखा चिरनेरकर, तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी न्यू मॅरिटाईम अँड जनरल कामगार संघटनेचे, तसेच एम. जी. ग्रुपचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी महेंद्रशेठ घरत आणि शुभांगीताई यांचा सपत्निक सत्कार केला.

## आंतरराष्ट्रीय पर्यावरण संस्थेकडून प्रदिप पट्टेबहादूर यांना राष्ट्रीय युवा पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**. रिसोड.तालुका. प्रतिनिधी**
**. रणजितसिह.ठाकुर**

"ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे, पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपरे यांच्या हस्ते अहिल्यानगर येथे होणार प्रधान" ..,दि. 1 जून, 2025, सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असलेले वाशिम तालुक्यातील केकतउमरा येथील युवा सामाजिक कार्यकर्ते तथा राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्थेचे प्रतिनिधी तथा नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळाचे अध्यक्ष व मा.राष्ट्रीय युवा कोर,माय भारत केंद्र वाशिम भारत सरकार आणि पर्यावरण प्रेमी प्राणी व सर्पमित्र युवाश्री प्रदिप पट्टेबहादूर (जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त - महाराष्ट्र शासन), यांना पर्यावरण संवर्धन विकास योजना व शासन पर्यटन धोरण 2016 च्या अंतर्गत भारत सरकार नीती आयोग द्वारा प्रमाणित भारत सरकार जनजाती कार्य मंत्रालय, सामाजिक न्याय अधिकारीता मंत्रालय प्रमाणित आय.एस.ओ व शासन मान्यता प्राप्त आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्था राष्ट्रीय पर्यटन विकास व सांस्कृतिक कला महोत्सव संस्था यांच्या द्वारे आयोजित करण्यात आलेल्या उन्हाळी अधिवेशन 2025 व संस्थेच्या 7 व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रीय पर्यावरण पर्यटन व साहित्य परिषद 2025 चे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय कार्य गौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये वाशिम जिल्ह्यातील केकतउमरा या खेड्या गावातील युवाश्री प्रदिप पट्टेबहादूर यांना सन 2025 चा राष्ट्रीय युवा पुरस्कार जाहीर झाला असून 3 जून 2025 रोजी अहिल्यानगर राळेगणसिद्धी येथे प्रदान करण्यात येणार आहे. त्यांनी. मागील दहा ते बारा वर्षा पासून सामाजिक सेवा पर्यावरण वृक्ष संवर्धन वन्यजीव संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, शिक्षण, कला, खेळ,महिला सक्षमीकरण, मासिक पाळी, नशा मुक्त भारत, अंधश्रद्धा निर्मूलन, नेतृत्व विकास, आरोग्य व रक्तदान शिबिर,रुग्णसेवा तरुणांच्या सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक आणि इतर क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल या संपूर्ण कार्याची दखल घेऊन त्यांना येत्या 3 जून 2025 रोजी अहिल्यानगर राळेगण सिद्धी येथे आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटक ज्येष्ठ समाजसेवक मा.डॉ. पद्मश्री,पद्मभूषण अण्णा हजारे, बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे, विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. श्रीधर जाधव,आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्था भारत संस्थापक आंतरराष्ट्रीय अध्यक्ष श्री. देवा तांबे आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये युवा सामाजिक कार्यकर्ते प्रदिपकडुजी पट्टेबहादूर यांना सन -2025 चा राष्ट्रीय युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.



# जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाने तक्रारदारांचे प्रश्न तातडीने निकालात काढावेत

### सर्व सामान्यांचे प्रश्न स्थानिकस्तरावरच सुटायला हवेत - जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी, (जिमाका):** लोकशाही दिनामध्ये बहुतांशी प्रश्न हे जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाशी निगडीत असतात. हे प्रश्न तक्रारदार आणि संबंधित अधिकारी यांना आजच बोलावून घेवून तातडीने निकालात काढावेत. तक्रार घेवून येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना क्षेत्रीय स्तरावरच संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारी सोडवून न्याय द्यायला हवा, अशी सूचना जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज झालेल्या लोकशाही दिनामध्ये जिल्हाधिकारी श्री. सिंह यांनी प्रलंबित अर्जांचा सर्वप्रथम आढावा घेतला. फेब्रुवारी महिन्यापासून प्रलंबित असणाऱ्या राजापूर



तालुक्यातील कशेळी येथील साक्षी संतोष नाटेकर यांच्या अर्जावर ते म्हणाले, जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी यांनी ही समस्या तातडीने सोडवायला हवी होती. आजच श्रीमती नाटेकर यांना कार्यालयात बोलवून संबंधित अधिकाऱ्यांनी ही समस्या तातडीने निकालात काढावी, अशी सूचना उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजयसिंह जाधव यांना दिली. अन्य तक्रार अर्जांबाबत संबंधित अधिकारी, गटविकास अधिकारी प्रत्यक्ष तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे उपलब्ध नसल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. पुढच्या लोकशाही दिनापासून संबंधित तक्रार अर्जांबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल घेवून सोबत यावे, असेही ते म्हणाले. तक्रार घेवून येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना क्षेत्रीय स्तरावरच संबंधित अधिकाऱ्यांनी न्याय द्यायला हवा. त्यांना जिल्हास्तरावर यायला लागू नये. याची दक्षता सर्वांनीच घ्यायला हवी असेही जिल्हाधिकारी म्हणाले. यावेळी अपर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी चंद्रकांत सूर्यवंशी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर जगताप, समाजकल्याण सहायक आयुक्त दीपक घाटे आदींसह अन्य अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. क्षेत्रीय स्तरावरील प्रातांधिकारी, तहसिलदार दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले.

# सुट्टीत केली मुलांनी मुक्त हस्ते रंगांची उधळण.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

आजकाल मुलांना मोबाईल नावाचे खेळण मिळाल्यापासून मुले अहोरात्र फावल्या वेळी मोबाईल घेऊन बसतात,मैदानी खेळ, कार्यानुभावातील कौशल्य हे सार काही विसरून मोबाईल च्या आहारी गेले आहेत. मग कंटाळा येतो, चिडचिड होते. आपला असा वेळ कुठे आणि कसा घालवायचा हा त्यांच्यासमोर मोठा प्रश्न निर्माण होतो. सुट्टीतील वेळेचा सदुपयोग, यासाठी सुवर्ण पर्याय योशिता आर्ट च्या सौजन्याने ऍक्रेलिक पेंटिंग चे दहा दिवसांचे कार्यशाळा वर्ग घेण्यात आले. हे वर्ग द्रोनागिरी सेक्टर १२ मध्ये व स्टाफ क्लब जेएनपीटी अशा दोन ठिकाणी घेण्यात आले. ह्या कार्यशाळेला जवळजवळ ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये विद्यार्थ्यांनी कॅनव्हास पेंटिंग, ग्लास पेंटिंग, टी-शर्ट पेंटिंग, कॅप पेंटिंग, पेन होल्डर, स्टोन पेंटिंग, बलून पेंटिंग, ग्रीटिंग कार्ड पेंटिंग



व पेन होल्डर पेंटिंग असे विविध प्रकार विद्यार्थ्यांनी उत्साहाने आणि आनंदाने पूर्ण केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या सर्व कलाकृतींचे प्रदर्शन बुधवार दिनांक २८/०५/२०२५ रोजी स्टाफ क्लब जे एन पी टी मध्ये भरविण्यात आले होते. ह्या प्रदर्शनाचे उद्घाटन माननीय ब्रम्हाकुमारी उज्वला दीदी, ब्रह्माकुमारी संध्या दीदी, किरण घरत पालक संघर्ष समिती अध्यक्ष, रमाकांत गावंड राष्ट्रपती पदक विजेते मुख्याध्यापक यांच्या हस्ते पार पडले. ऍक्रेलिक पेंटिंग कार्यशाळा दहा दिवसाची पूर्ण केल्याबद्दल मुलांना मान्यवरांच्या हस्ते सर्टिफिकेट देण्यात आले. ह्या कार्यक्रमाला मुलांसोबत त्यांचे पालक ही मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या कलाकृतीच्या प्रदर्शनाचा आनंद परिसरातील कला प्रेमींनी मोठ्या संख्येने घेतला.

ह्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन चित्रकार मिलिंद ठाकूर यांनी केले. ते स्वतः जी डी आर्ट, ए एम आहेत व गेली ३१ वर्ष विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन करत आहेत.मिलिंद ठाकूर सरांचे वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या विद्यार्थ्यांला चित्रकलेची आवड, रुची नसेल तरी ते आपल्या विद्यार्थ्यांना त्यामध्ये उत्तम मार्गदर्शन करून त्याच्यात चित्रकलेविषयी आवड निर्माण करतात याशिवाय जमणार नाही हा शब्द च त्यांच्या शब्दकोशात नाही ते विद्यार्थ्यांकडून करून घेतात त्यांचे विद्यार्थी आजही त्यांच्या या कलेचा आदर करुन उत्कृष्ट चित्रकार म्हणून नावारूपास आले आहेत.

## महिलेचे आक्षेपार्ह फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन केले ब्लॅकमेल करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

महिलेचे आक्षेपार्ह फोटो गावात दाखवण्याची धमकी दिल्याप्रकरणी आरोपी उपेंद्र अद्यासिंग याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिला २६ वर्षाची असून उपेंद्र याने नकळत त्यांचे काही आक्षेपार्ह फोटो काढले होते. त्यानंतर २०१८ मध्ये त्याच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. त्यानंतर त्याच्यावर पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. मे २०२५ मध्ये या महिलेचे लग्न झाले. त्यानंतर उपेंद्रने महिलेच्या दिराच्या मोबाईलवर फोन करुन महिलेचे फोटो पाठवले आणि पीडित महिलेशी लग्न झाल्याचे खोटे सांगितले. तसेच २०१८ मध्ये नोंद केलेला गुन्हा मागे घेवून सात लाख रुपयांची मागणी केली.

## घरकाम करणाऱ्या महिलेने दागिन्यांसह रोख रक्कम केली लंपास

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

खारघरमध्ये प्राध्यापक महिलेकडे घरकाम करणाऱ्या महिलेने रोख रक्कम आणि सोन्याचे दागिन्यांची चोरी केली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात रिंकी कुमार या महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राध्यापक महिलेने तीन लाख ५६ हजार रुपये आणि दागिने ड्रॉवरमध्ये ठेवले होते. सामानाची आवराआवर करताना त्यांनी पैसे आणि दागिने सापडले नाहीत. म्हणून संशयावरून त्यांनी रिंकी कुमार आणि तिच्या पतीला फोन करून वस्तू परत करण्याबाबत सांगितले. त्यावर त्यांनी टाळाटाळ केली. त्यानंतर त्यांच्याविरोधात खारघर पोलिसांत तक्रार करण्यात आली.

# राज्य इक्वीपड पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडचे यश

**राज्य इक्वीपड पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडचे यश दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पालघर येथे दिनांक 31 मे 2025 ते एक जून 2025 या कालावधीत झालेल्या* *राज्यस्तरीय इक्विपड पॉवरलिफ्टिंग स्पर्धेमध्ये रायगड* जिल्हा संघास!महिला गटाचे सांघिक विजेतेपद मिळाले आहे. तसेच स्पर्धेच्या विविध गटात खेळाडूंनी ६ सुवर्ण,६ रौप्य आणि १ कांस्य अशी एकूण १३ पदकांची कमाई केली आहे याबद्दल खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशनचे रायगड अध्यक्ष गिरीश वेदक, सेक्रेटरी अरुण पाटकर, सह सेक्रेटरी सचिन भालेराव यांनी केले आहे. तसेच कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल, खजिनदार राहुल गजरमल, कार्यकारिणी सदस्य सुभाष दगडू टेंबे, संदीप कृष्णा पाटकर, मानस कुंटे, माधव गोविंद पंडित, दत्तात्रय मोरे, सुभाष भाटे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे तसेच पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

रायगडच्या या यशाबाबत राज्य संघटनेचे सेक्रेटरी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई सर आणि शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सतीश पाताडे यांनी खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. खेळाडूंच्या मेहनतीचे यश असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. राज्य स्पर्धेतील सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदक विजेते खेळाडू पुढील प्रमाणे आहेत.

*सुवर्णपदक विजेते खेळाडू*-------१. गणेश तोटे (सिनिअर स्पर्धा) २. महेश पाटील (मास्टर स्पर्धा)३. गायत्री बडेकर ( सिनिअर स्पर्धा)४. आचल राजभर (सब ज्युनिअर स्पर्धा) ५. अंजली येवले (ज्युनिअर स्पर्धा)६. लावण्या भगत(जूनियर स्पर्धा.)

*रौप्य पदक विजेते खेळाडू*१. संतोष गावडे(मास्टर स्पर्धा)२. गायत्री बडेकर (ज्युनिअर स्पर्धा)३.गार्गी मसुरकर (ज्युनि. स्पर्धा)४. जान्हवी बडेकर(ज्युनि. स्पर्धा)५. प्रितेश बांगर(ज्युनियर स्पर्धा)६.कुशल घारे(ज्युनियर स्पर्धा)

*कांस्य पदक विजेते खेळाडू*-१.हर्षल देशमुख(ज्युनियर स्पर्धा) या स्पर्धेत पॉवर लिफ्टिंग रायगड संघाचे व्यवस्थापक म्हणून प्रवीण भगत (अलिबाग) आणि सहाय्यक म्हणून प्रथमेश भालेकर(कर्जत) यांनी जबाबदारी पार पाडली.






# महापालिकेच्यावतीने पर्यावरण दिनानिमित्त भव्य सायकल रॅलीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
**प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन" विषयावर जनजागृतीसाठी महापालिकेच्यावतीने सायकल रॅली**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल महानगरपालिका आणि विविध सायकलिंग संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली "प्लास्टिक प्रदूषणाच्या निर्मूलनाचे महत्त्व" या विषयावर जनजागृती करण्यासाठी आज दिनांक १जून रोजी सकाळी सायक्लोथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले. उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सुचनेनुसार घेण्यात आलेल्या या रॅलीला महापालिका सहायक आयुक्त श्रीराम पवार यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरूवात करण्यात आली. भारत पेट्रोल पंप (ओरियन मॉल जवळ) येथून सुरू होऊन एचडीएफसी सर्कल – आयडीएफसी सर्कल मार्गे पुन्हा वडाळे तलाव येथे या रॅलीचा समारोप करण्यात आला. नामवंत सायकलिंग क्लब्स आणि पर्यावरणप्रेमींनी या सायकल रॅली मध्ये सहभाग नोंदविला. यामध्ये पनवेल






बायसिकल ग्रुपचे मेयर सुधीर चाकोळे, पूरनसिंग मेहरा, आणि जानेट लॉरेन्स बर्नार्ड (रनथॉन सायक्लिंग क्लब) यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. सुमारे १०० पर्यावरणप्रेमी सायकलस्वारांनी यात सहभाग नोंदविला. यावर्षी युएनईपी (UNITED NATIONS ENVIRONMENT PROGRAMME) यांनी "जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन" (ENDING PLASTIC POLLUTION GLOBALLY) ही थीम घोषित केलेली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने २२ मे ते ५ जून या कालावधीत देशभर जनजागृतीसाठी विशेष मोहिम राबवण्याचे निर्देश दिले आहेत. यास अनुसरून महापालिकेच्यावतीने माझी वसुंधरा अभियानांतर्गत आयोजित केलेल्या या सायकल रॅलीमध्ये प्लास्टिक प्रदूषणाचे तोटे,प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठीच्या उपाय योजना बाबत संदेश देण्यात आला. रॅलीत सहभागी झालेल्या प्रमुख सायकलिंग

**संघटना :**
रनथॉन सायक्लिंग क्लब
फिट इंडिया संडे सायक्लिंग
बीवायसीएस (BYCS)
पनवेल सायक्लिंग क्लब
डेकाथलॉन सायक्लिंग क्लब
टीम केकेसीसी (KKCC)
पनवेल रायडर्स

## फेक कॉलद्वारे वृद्धाची ६१ लाखांची फसवणूक करणाऱ्याला दिल्लीत पकडले

### रत्नागिरी सायबर पोलिसांची कामगिरी

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी प्रतिनिधी**

मिनिस्ट्री ऑफ कम्युनिकेशन विभागातून बोलत असल्याची बतावणी करत वृध्दाची तब्बल 61 लाख19 हजार 80 रुपयांची ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या संशयिताच्या सायबर पोलिसांनी दिल्लीतून ताब्यात घेतले. राजीव विश्वनाथ तिवारी (47,रा.शिवनगर कॉलनी पहाड गंज उत्तरप्रदेश) असे ताब्यात घेण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याने काही महिन्यांपूर्वी शहरातील एकाल वृध्दाला मी मिनिस्ट्री ऑफ कम्युनिकेशन विभागातून बोलत असून तुमचे सिम कार्ड बंद होणार असल्याची भिती घातली. त्या निमित्ताने पोलिसांकडे तक्रारी करता कॉल फॉरवर्ड करत असल्याचा बहाणा करुन अन्य एका आपल्या साथिदारामार्फत फिर्यादीला तुमचे कॅनरा बँकेत खाते उघडण्यात आले असून त्यातून 2 कोटी रुपयांचा मनी लाँड्रिंगचा व्यवहार झाल्याची भिती घातली. त्यानंतर फिर्यादीला त्या खात्यामध्ये रक्कम भरण्यस भाग पाडून ही फसवणूक केली होती. याप्रकरणी सायबर पोलिस तपास करत असताना त्यांना बँकांकडून प्राप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाव्दारे संशयित हा दिल्लीत असल्याचे निष्पन्न झाले. सायबर पोलिसांच्या पथकाने त्याठिकाणी जाउन कोणत्याही प्रकारचे मोबाईल लोकेशन प्राप्त नसताना स्थानिक बातमीदार तयार करुन संशयिताला ताब्यात घेतले. त्याला न्यायालयाने 4 दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या



गुन्ह्याचा तपास व संशयिताला अटक करण्यासाठी पोलिस अधिक्षक नितीन बगाटे व अपर पोलिस अधिक्षक जयश्री गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखली सायबर पोलिस ठाण्यातील प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक स्मिता सुतार,पोलिस हवालदार रामचंद्र वडार,संदिप नाईक,रमिज शेख पोलिस कॉंस्टेबल रोहन कदम,रामदार पिसे यांनी केली.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle



रायगड कोकणचे भाग्यविधाते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार सय्यद अकबर,साबीर शेख,एडव्होकेट महेबूब पटेल,अयूब शेख आदि मान्यवर
( छायाचित्र दैनिक युवक आधार )

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त मलकापूर येथे इंडियन एक्सलन्स अवॉर्ड संपन्न

## महाराष्ट्राचे कानाकोपऱ्यातील आलेल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करण्यात आला.

**दैनिक युवक आधार**
**संपादक संतोष आमले**

दैनिक अहिल्याराज व हिंदी मराठी पत्रकार संघ द्वारा पुण्यश्लोक अहिल्यादेवी जयंती व दैनिक अहिल्या राज वर्धापन दिवस निमित्ताने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी इंडियन एक्सलन्स अवार्ड 2025 चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रस्ताव ऑनलाइन मागवण्यात आले होते
त्यावेळी 700 प्रस्तावांपैकी निवड करून 260 मान्यवरांना इंडियन एक्सलन्स पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला. इंडियन एक्सलन्स अवार्ड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजूभाऊ काजळे सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती मलकापूर




हे होते कार्यक्रमाचे उद्घाटक धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ हे होते. कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून निलेश तायडे सहा माहिती आयुक्त मंत्रालय मुंबई, संदीप काळे ठाणेदार मलकापूर ग्रामीण, भाई अशांत वानखेडे संस्थापक समतेचे निळे वादळ, प्रसादभाऊ जाधव राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष, बाळासाहेब दामोदर उद्योजक, प्रा. डॉ. अनिल खर्चे सर प्राचार्य इंजिनिअरिंग व्ही. भी. कोलते इंजीनियरिंग कॉलेज, फारुख शेख ज्येष्ठ पत्रकार लोकमत, वीरसिंग दादा राजपूत ज्येष्ठ पत्रकार, दामोदर शर्मा शेतकरी संघटना, गजानन ठोसर पत्रकार , संतोष पाटील ज्येष्ठ नेते होते. कार्यक्रमाची सुरुवात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर, आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व प्रथम महिला संपादक तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमात पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक ,राजकीय ,कला, वैद्यकीय, वकील, उद्योजक अशा अनेक क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तींचा सत्कार इंडियन एक्सलन्स अवार्ड 2025 देऊन करण्यात आला. यावेळी देशासाठी आपल्या प्राणाची परवा न करता देशसेवा करणाऱ्या माजी सैनिकांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. महिलांसाठी मानाचे असे समजले जाणारे अंगणवाडी शिक्षिका व आशा सेविका भगिनींचा सत्कार देखील या कार्यक्रमात करण्यात आला.

सदर कार्यक्रमाला पत्रकार अजय टप, सतीश दांडगे, प्रकाश थाटे, विनायक तळेकर, धर्मेश राजपूत, शेख जमील, अनिल गोठी, रवींद्र गव्हाळे,मयूर लड्डा, प्रदीप इंगळे ,शेख निसार, सुधाकर तायडे , बिस्मिल्ला पठाण, आत्माराम मोरे , निलेश चोपडे, सुनील देशमुख, यासह आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र गणगे सर यांनी तर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण तायडे यांनी केले.

### इंडियन एक्सलन्स अवॉर्ड कार्यक्रमात 260 अवार्ड वितरित

सामाजिक क्षेत्रात 48, कला क्षेत्रात 17, कृषी क्षेत्रात 6, वैद्यकीय क्षेत्रात 5, क्रीडा क्षेत्रात 3, राजकीय क्षेत्रात 10, पत्रकार क्षेत्रात 65 , साहित्य क्षेत्रात 5, शिक्षण क्षेत्रात 63 , संस्था क्षेत्रात 30 , वकील क्षेत्रात 1 पर्यावरण क्षेत्रात 2, महिला क्षेत्रात 5 असे एकूण 260 पुरस्कार देण्यात आले.

# पावसाळ्या पूर्वी शांतीनगर प्रभागातील कामांना वेग द्यावा..विक्रमशेठ साबळे

## नागरी सुविधा देण्यासाठी उपायोजना नाही ; स्वच्छतेच्या कामात दिरंगाई ....

**दैनिक युवक आधार**
**खोपोली प्रतिनिधी**

मान्सूनपूर्व साफसफाईच्या कामांची पाहणी करताना
शांतीनगर दत्त मंदिर जवळी स्थानिक रहिवाशांच्या घरांच्या सांडपाणी वाहणाऱ्या गटारांची दुरावस्था पडीक नादुरुस्त झाल्याने त्यामध्ये मोठया प्रमाणात साचलेला कचरा काढता येत नसल्याचे स्वच्छता दूत पालिका कर्मचाऱ्यांनी अनेकदा नागरिकांना सांगितले. परिणामी घरातील सांडपाणी व पावसातील पाण्याचा निचरा नियमितपणे होत नसून त्या ठिकाणी गटार तुंबले असून त्यात संपूर्णतः मातीचे ढीग जमून गटर पूर्ण पणे बंद झाले असल्याचे निर्देशनात आले. अल्प उत्पन्नातुंन मोल मजुरी करून कर भरणारे करदाते पालिकेच्या सोयी सुविधांपासून वंचित असून खोपोली नगर परिषदेच्या वार्ड अधिकारी व स्वच्छता दूतांच्या दुर्लक्षपणाचा बेजबाबदार पणा कर्तव्यात कसूर करण्याचा प्रकार समोर येत असल्याची तक्रार नागरिकांनी सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहणारे युवा उद्योजक विक्रमशेठ साबळे यांच्या जनसंपर्क कार्यालयात जाऊन सांगितली .त्यावेळी रहिवाशांची मूलभूत अडचण पाहता सविस्तर माहिती घेत तात्काळ त्यावर पालिकेकडून त्वरित उपाययोजना व्हाव्या यासाठी विक्रम साबळे यांनी दूरध्वनी द्वारे खोपोली नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांना सांगितले. आणि लवकरच यावर कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी नियोजन करू असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला . प्रभागामध्ये संसर्गजन्य रोगराई न पसरावी यासाठी जंतुनाशक फवारणी करण्याची सूचना त्यांनी करत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून प्रभागाची पाहणी केली यावर नागरिकांनी समाधान व्यक्त करत आभार मानले.









# शाहेद कादरी यांच्या विदर्भ दौरा...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**

क्रांतिकारी शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य यांचे संस्थापक सचिव श्री शाहेद कादरी व असरार खान सर सोबतच मोहम्मद शफी इनामदार उपाध्यक्ष क्रांतिकारी शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या औरंगाबाद, जालना, बुलढाणा, मलकापूर, शेगाव, अकोला, अमरावती, वाशिम, हिंगोली, परभणी असे विदर्भाचे द्वारे जाहीर झाले सर्व प्रथम कादरी साहेब बीड वरून जालना आणि तिथून मलकापूर विदर्भदवार येथे उर्दू गर्ल्स हायस्कूल मलकापूर चे शिक्षक श्री मोहम्मद शकील अब्दुल अजीज कुरेशी यांचे निवासस्थानी भेट दिले त्यांचे सर्व प्रथम सत्कार करण्यात आले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ऑल इंडिया जमेतून कोरेश चे सेक्रेटरी जनरल व मलकापूर नगर परिषद चे माजी अध्यक्ष अँड.श्री.अब्दुल माझी अब्दुल कबीर कुरेशी हे होते प्रमुख पाहुणे म्हणून संघटनाचे संस्थापक सचिव श्री.शाहिद कादरी श्री.असरार सर व संस्थापक उपाध्यक्ष श्री.मोहम्मद शफी इनामदार हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.असरार खान यांनी आपले भाषणात व्यक्त केले. तर या कार्यक्रमांमध्ये बुलढाणा जिल्ह्याचे नियुक्ती करण्यात आले. ज्या मध्ये सर्व प्रथम माजी उमेदवार अमरावती विभाग शिक्षक मतदार संघ श्री.मोहम्मद शकील अब्दुल अजीज कुरेशी शिक्षक यांना जिल्हाध्यक्ष बुलढाणा म्हणून नियुक्ती देण्यात आली. तसेच जिल्हा उपाध्यक्ष फिरोज खान फिरोज शिक्षक जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मलकापूर व मलकापूर तालुकाध्यक्ष श्री.शेख जुबेर शेख अमीर यांना करण्यात आला. कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित शाहिद कादरी यांनी



आपल्या भाषणात क्रांतिकारी शिक्षक संघटना बळळकट करण्यासाठी या दौऱ्याच्या कार्यक्रम जाहीर केला आणि त्यांनी संघटना मजबूत करण्यात करीता कार्यकर्त्यांना आवाहन केले. तर आभार प्रदर्शन श्री.मोहम्मद शफी इनामदार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता हे स्थानिक क्रांतिकारी शिक्षक संघटनाचे कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. शेवटी आभार प्रदर्शन करण्यात आले.

# महावितरणतर्फे निफाड येथे निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेचे आयोजन.

## निफाड आयटीआय मध्ये ३ जून रोजी तर होरायझन अकॅडमि ४ जून रोजी स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

निफाड महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या 20 व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरात 1 ते 6 जून दरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात असून या सप्ताह अंतर्गत निफाड येथे आयटीआयच्या विद्यार्थ्यांसाठी आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी ,महावितरण कर्मचारी पाल्यांसाठी
निबंध स्पर्धा आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती महावितरणचे निफाड उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता निलेश नागरे यांनी दिली

„आम्ही सुरक्षेचे शिल्पकार, शून्य विद्युत अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार" हे या स्पर्धेचे ब्रीद वाक्य आहे बुधवार दिनांक 3 जून रोजी फक्त आयटीआयच्या विद्यार्थ्यांसाठी निफाड येथील शासकीय आयटीआय येथे निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा संपन्न होतील

त्याचप्रमाणे दिनांक 4 जून रोजी इतर शाळेतील विद्यार्थ्यांसाठी व महावितरणच्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी निफाड येथील होरायझन अकॅडमी येथे या स्पर्धा संपन्न होतील.




होरायझन अकॅडमी येथे सकाळी 10 ते 11 या वेळेत निबंध स्पर्धा तर सकाळी 11 ते 1 या वेळेत चित्रकला स्पर्धा संपन्न होतील विद्युत सुरक्षितता या विषयावर *चित्रकला व निबंध स्पर्धेचे* आयोजन करण्यात आलेले आहे. "सदर स्पर्धेसाठी कोणतेही शुल्क नसून या स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक प्राप्त करणाऱ्या स्पर्धकांना विविध बक्षीसे ठेवण्यात आली आहे
. निफाड तालुक्यातील 1 ली ते 10 वी च्या इयत्तेतील जास्त जास्त विद्यार्थ्यांनी होरायजन अकॅडमिमध्ये होणाऱ्या सदर स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन चांदवड विभागाचे कार्यकारी अभियंता केशव काळुमाळी व निफाड ।उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता निलेश नागरे, उमेश पाटील, काकड व शिंदे यांनी केले आहे.

# अधिकृत माहिती घेवून मानवी दृष्टिकोनातून वार्तांकन करावे – जितेंद्र दीक्षित

**दैनिक युवक आधार**

**रत्नागिरी, (जिमाका)** एखादा संघर्ष झाल्यास लोकांना जागृत करणे आपले काम आहे. अशा वेळी अधिकृत माहिती घेवून मानवी दृष्टीकोनातून जबाबदारीने वार्तांकन करावे, असे मार्गदर्शन एनडीटीव्हीचे वृत्त संपादक जितेंद्र दीक्षित यांनी केले. विभागीय कोकण माहिती कार्यालय, जिल्हा माहिती कार्यालय रत्नागिरी यांच्यावतीने घेण्यात आलेल्या कोकण विभागातील पत्रकारांसाठी दोन दिवसीय कार्यशाळेत युध्दजन्य परिस्थितीतील पत्रकारिता या विषयावर ते मार्गदर्शन करत होते. यावेळी माहिती संचालक हेमराज बागुल उपस्थित होते. संगणकीय सादरीकरण



करत श्री. दीक्षित म्हणाले, वार्तांकनाच्या माध्यमातून संघर्षाचे कारण माहिती करून घेणे आवश्यक आहे. संघर्षात आपण बाधित लोकांचा आवाज आहोत. संघर्षाच्या काळात अफवा पसरण्यापासून थांबविणे ही आपली जबाबदारी आहे. या कारणांमुळे संघर्ष क्षेत्रातील पत्रकारिता महत्त्वाची आहे. संघर्ष क्षेत्रात जाण्यापूर्वी योग्य संशोधन करणे महत्त्वाचे असून, त्यामुळे प्रभावी वार्तांकन करता येऊ शकते. संघर्ष क्षेत्रात पत्रकार म्हणून आपली ओळख निर्माण करणे आवश्यक आहे. त्यामुळे वार्तांकन करण्यास मदत होते. संघर्ष क्षेत्रात जाताना आपल्या सोबत ओळखपत्र, जॅकेट, हेल्मेट, प्रथमोपचार पेटी, पावर बॅंक, पेन किलर आणि खाण्याचे काही सामान असावे. तेथे जाण्यापूर्वी तेथे आपली ओळखीची व्यक्ती आहे का, हे तपासून तेथील स्थिती जाणून घ्यावी. जे पात्र असेल त्यांनी डिफेन्स करस्पॉन्डंट कोर्स पूर्ण करावा. तेथील रिस्क असेसमेंट करावी, लोकांशी बोलावे. वार्तांकन करताना तुमची पोझिशनिंग निश्चित व सुरक्षित ठिकाणी असावे. पत्रकार म्हणून आपली ओळख स्पष्ट होईल, असे राहावे. एक्झिट प्लॅन तयार ठेवावा. स्थानिकांनी दिलेली माहिती दुर्लक्षित करू नये. टीमवर्क म्हणून काम करावे. अशा परिस्थितीत वैयक्तिक फायदा पाहू नये. नैतिक वार्तांकन करावे. बातमीत तथ्यात्मकता असावी. बातमी देताना संवेदनशीलता बाळगावी व निष्पक्ष रहावे. अशा परिस्थितीत फिजिकल डेंजर, सेन्सरशिप, चुकीची माहिती, इमोशनल टोल ही आव्हाने आहेत. वार्तांकन करताना अथवा केल्यानंतरच्या भावनात्मक धक्क्यातून सावरणे देखील गरजेचे आहे. अशा परिस्थितीत प्रेक्षकांना संघर्षाची माहिती प्रभावीपणे द्यावी, असे सांगून श्री. दीक्षित यांनी संघर्ष परिस्थितीत वार्तांकन करतानाचे त्यांचे अनुभव कथन केले. यावेळी प्र उपसंचालक अर्चना शंभरकर, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे यांच्यासह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रजाहितदक्ष लोकनेता रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतनाला अफाट गर्दी

## जाणत्या नेत्याच्या दीर्घायुष्यासाठी हजरत पीर करमअली शाह बाबा दर्गेवर प्रार्थना ...सय्यद अकबर

## लोकशाहीतील संत म्हणून आदरार्थी रामशेठ... साबीर शेख

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती!' या शीर्षकानुसार, सर्व स्तरातील माणसाच्या मनात त्यांच्याप्रती नेहमीच आदराचे स्थान असलेल्या, सर्वसामान्यांचे 'आधारवड' लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या लाखो चळवळीतील,संघर्षातील, यशातील हजारो सदस्यांनी आपल्या माऊली रुपी देव माणसाला अमृत महोत्सवी जन्मदिन शुभेच्छा देण्यासाठी पनवेल सी के टी महाविद्यालयाच्या भव्य दिव्य अशा कीर्तन महोत्सवाच्या व्यासपीठावर पुष्पहार, गुच्छ, भेट वस्तू देत अफाट मोठी गर्दी केलेली पहायला मिळाली . त्यांच्या लोकवरसा पुढे चालवणारे जेष्ठ पुत्र कार्यसम्राट आमदार प्रशांत रामशेठ ठाकूर, कनिष्ट पुत्र परेश रामशेठ ठाकूर व संपूर्ण रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी समितीने या कार्यक्रमासाठी नियोजनबद्ध अशी सुंदर व्यवस्था केलेली पाहायला मिळाली. वाढदिवसाच्या निमित्ताने लोक उपयोगी कार्यक्रम म्हणून आरोग्य रक्तदान, शिबिर, वृक्ष लागवड, शैक्षणिक साहित्य वाटप असे विविध उपक्रमांनी जन्मदिन कार्यक्रम आयोजिले होते . यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कट्टर समर्थक भाजपा अल्पसंख्यांक प्रदेश मोर्चा उपाध्यक्ष तथा सा. कोकण डायरीचे संपादक सय्यद अकबर व सा. सामान्य नागरिकच्या संपादक तथा अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश सदस्य साबिर शेख यांनी



पनवेल येथील हजरत पीर करमअली शाह बाबा दर्गा येथे त्यांच्या पुढील विकासाभिमुख कार्याच्या यशासाठी , आरोग्यदायी जीवनासाठी त्यांच्या कर्तृत्वाच्या गौरवासाठी त्यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पण त्यानिमित्ताने त्यांना पुढील आरोग्यदायी आयुष्यासाठी विश्वविधात्या कडे संतांच्या पवित्र दर्गे वर दुवा प्रार्थना केली . लोकनेते रामशेठ ठाकूर यांना अभिष्टचिंतन शुभेच्छा देताना सन्मानाची सुंदर पगडी, श्वाल व गुलाब पुष्पहार अर्पण करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी हजरत पीर करमअली शाह बाबा दर्गे वर तेथील खादिम यांच्या हस्ते सुगंधित अत्तर व पारंपरिक रीती रिवाजाप्रमाणे सुफी संतांच्या सन्मानात समाधीवर रेशमी चादर व पुष्पहार ,प्रसाद अर्पण केले. यावेळी एडव्होकेट महेबूब पटेल,नविद पटेल,अयूब शेख,इरफान शेख,पत्रकार सुनील कटेकर आदि मान्यवर व भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.
सय्यद अकबर वरचे माझ्यावर असलेले विशेष प्रेम तो नेहमी आपल्या कृतीतून दाखवतो मला याचा फार आनंद आहे असे उद्गार रामशेठ ठाकूर यांनी काढत सय्यद अकबर यांना कौतुकाची थाप दिली. यावेळी साप्ताहिक सामान्य नागरिक या वृत्तपत्राच्या लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवी जन्मदिन विशेष अंकाच्या प्रतीचे प्रकाशन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

# राळेगाव तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**

राळेगाव:-दि.३१-०५-२०२५ ला अहिल्याबाई होळकर जयंतीच्या निमित्ताने राळेगाव तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा घेण्यात आला. आयोजक राहुल मेश्राम यांच्या माध्यमातून सत्काराचा कार्यक्रम घेण्यात आला,कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये डॉक्टर प्रेमळ नवरंगे ऑर्थोपेडिक,डॉक्टर सोनाली नवरंगे तसेच एम.पी.एस.सी परीक्षा उत्तीर्ण अक्षय घावट,अडव्होकेट गोपाल चव्हाण, डॉ. प्रेमळ नवरंगे,डॉ. सोनाली नवरंगे,इंजि.अक्षय घावट प्रा.आशिष कांबळे सर अड .गोपाल चव्हाण श्री.मारोती मेश्राम इत्यादी मान्यवर उपस्थित होते तर घायवटे सर यानी सूत्र संचलन केले यांच्यासह अनेक अतिथींचा समावेश होता.दहावीच्या विद्यार्थ्यांना ८० पेक्षा जास्त टक्के तसेच ७०% पेक्षा जास्त टक्के मिळविणाऱ्या बारावीच्या विद्यार्थी यांचा तालुकास्तरीय कार्यक्रमात सहभाग होता.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी सितारामजी बरसी हे होते.भविष्यकाळात समोर जाण्यासाठी कॅरियर गाईडन्स चे महत्व पटवून देण्यात आले. अडचणींवर मात करून ग्रामीण भागातूनही कसे दर्जेदार विद्यार्थी तयार करता येईल याबद्दल विशेष मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमात विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांचाही सत्कार करण्यात आला. हा आगळावेगळा कार्यक्रम तालुका राळेगाव येथील भाऊसाहेब कोल्हे सभागृहात घेण्यात आला.स्मॉल वंडर हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज वडकी या




महाविद्यालयातून बारावीच्या विद्यार्थ्यांमध्ये देवयानी महाजन,पुनीत भंडारी यांचा सहभाग होता तर संस्कृती राजूरकर,श्रेया अष्टेकर,सुमित भंडारी,क्रिश ताजने या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात आपल्या पालकांसह हजेरी लावली.गुणवत्तेला प्रशंसा मिळाली पाहिजेच असे कार्यक्रम ग्रामीण भागात घेण्यात आले पाहिजे असे पालकांनी मत व्यक्त केले.

# घरकाम करणाऱ्या महिलेने दागिने आणि रोख रक्कम चोरली

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

घरकाम करणाऱ्या महिलेने आणि तिच्या पतीने दागिने आणि रोख रक्कम चोरल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात दोघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सेक्टर 7, खारघर येथे राहणाऱ्या चाळीस वर्षीय महिला प्रोफेसर आहेत. त्यांच्या घरी रिंकी कुमार ह्या काम करतात. त्यांनी सोन्याचे दागिने, रोख रक्कम ड्रॉवरमध्ये ठेवले होते. त्यावेळी सामानाची आवरावर आणि साफसफाई सुरू केली असता कपड्यांमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने दिसून आले नाहीत. तसेच रोख रक्कम देखील सापडली नाही. यावेळी काम करणारे रिंकी कुमार व तिच्या पतीला फोन करून वस्तू परत करण्याबाबत सांगितले. मात्र त्यांनी ते परत केले नाही व टाळाटाळ केली. तीन लाख 56 हजार पाचशे रुपयांचे दागिने आणि रोख रक्कम चोरीला गेल्या प्रकरणी दोघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# महिलेचे आक्षेपार्ह फोटो गावात पाठवण्याची धमकी, गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

महिलेचे आक्षेपार्ह फोटो गावात दाखवण्याची धमकी दिल्याप्रकरणी आरोपी उपेंद्र अद्यासिंग याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील पीडित महिला 26 वर्षाची असून उपेंद्र याने नकळत त्यांचे काही आक्षेपार्ह फोटो काढले होते. त्यानंतर 2018 मध्ये त्याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आणि पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. मे 2025 मध्ये पीडित महिलेचे लग्न झाले. लग्नानंतर महिलेच्या दिराच्या मोबाईलवर उपेंद्र याने फोन करून महिलेचे फोटो पाठवले आणि पीडित महिला आणि त्याने यापूर्वी लग्न केले असल्याचे खोटे सांगितले. यावेळी 2018 मध्ये नोंद केलेला गुन्हा मागे घेवून सात लाख रुपयांची मागणी केली, अन्यथा महिलेचे फोटो सर्व गावात पाठवेल अशी धमकी त्याने दिली.

# 88 हजारांचा मोबाईल हिसकावला

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

रस्ता क्रॉस करत असताना मोटरसायकलवर आलेल्या दोन अनोळखी ईसमानी 46 वर्षीय महिलेच्या हातातील 88 हजार रुपयांचा गॅलेक्सी एस 22 अल्ट्रा मोबाईल हिसकावून घेऊन गेले. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात 29 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मीनल खंदारे या कामोठे येथे राहत असून 24 मे रोजी त्या कामोठे सेक्टर 20 येथे मार्केटमध्ये गेल्या. खांदेश्वर रेल्वे स्टेशन येथे जाण्यासाठी त्या व त्यांची बहीण सेंट्रल बँकेसमोरील रस्ता क्रॉस करत असताना विना नंबर प्लेटच्या मोटरसायकल वरून दोघे आले आणि एकाने खंदारे यांच्या हातातील मोबाईल हिसकावला आणि ते खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या दिशेने पळून गेले.

# घाटंजीमध्ये महावितरणतर्फे सुरक्षा सप्ताहाअंतर्गत जनजागृती रॅली संपन्न

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**

घाटंजी: महावितरणद्वारे दरवर्षी १ ते ६ जून दरम्यान साजरा केल्या जाणाऱ्या सुरक्षा सप्ताहाचे औचित्य साधून घाटंजी येथे वीज सुरक्षा जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात, नागरिकांना वीज वापरताना पाळायचे सुरक्षा नियम आणि संभाव्य धोक्यांबद्दल जागरूक करण्याचा प्रयत्न केला जातो. या जनजागृती रॅलीमध्ये शहराच्या मुख्य रस्त्यांवरून फिरत नागरिकांना सुरक्षिततेचा संदेश देण्यात आला. वीज अपघातांचे प्रमाण कमी करून 'शून्य अपघात' हे ध्येय गाठण्यासाठी ही रॅली काढण्यात आली होती. "आम्ही सुरक्षेचे शिल्पकार, शून्य अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार" हे ब्रीदवाक्य घेऊन महावितरणने या सुरक्षा सप्ताहाला सुरुवात केली आहे. यावेळी एस. एन. कुर्रा (उपकार्यकारी अभियंता, घाटंजी उपविभाग), कोमल भांगे (सहाय्यक अभियंता, उपविभाग घाटंजी), गौरव कनाके (सहाय्यक अभियंता, घाटंजी शहर), प्रशांत नाईक (सहाय्यक अभियंता, घाटंजी ग्रामीण), अनुराग नैताम (कनिष्ठ अभियंता, शिरोली), सूरज देसाई (कनिष्ठ अभियंता, मोहदा) यांच्यासह महावितरणचे सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महावितरण कंपनी ६ जून रोजी आपला वर्धापन दिन साजरा करत असून, या निमित्ताने घाटंजी महावितरणने आपल्या सर्व ग्राहकांना सुरक्षित आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्याचे आश्वासन दिले आहे. या सुरक्षा सप्ताहामुळे नागरिकांमध्ये वीज सुरक्षेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# विरार येथे कुणबी समाजाचा भव्य रक्तदान शिबिर मोठया उत्साहात संपन्न

## सभासदांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कुणबी बांधवांनी जपला जनसेवेचा वसा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर**

कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई , विभागीय शाखा विरार,संलग्न कुणबी युवा विरार आणि कुणबी महिला मंडळ विरार यांच्या माध्यमातून विभागीय शाखा विरार चे खजिनदार शैलेश बामणे, शाखेचे सहसचिव सिताराम नवाले तसेच पर्यावरण मित्र बहुद्देशीय संस्था, भारतचे अध्यक्ष विजय चोघळा यांच्या वाढदिवसानिमित्त विभागीय शाखा विरारचे अध्यक्ष किशोर भेरे आणि कुणबी रणरागिणी मा.नगरसेविका तथा कुणबी महिला मंडळ विरारच्या अध्यक्षा सौ. संगीताताई भेरे, कुणबी युवा अध्यक्ष अविनाशजी पाचकले यांच्या मार्गदर्शनाने बोरिवली ब्लड बँक,दहिसर यांच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबिर रविवारी ( १ जून) ज्युपिटर स्कूल,मनवेल पाडा येथे पार पडले. या कार्यक्रमाला विभागातील रक्तदात्यांनी सकाळपासूनच




उत्फुर्त प्रतिसाद दिला.रक्तदात्याच्या प्रतिसादाने दिवसभरात १५० पेक्षा जास्त रक्त दात्यांनी नोंदणी केली. त्यापैकी १०१ रक्त दात्यांनी यशस्वी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.या कार्यक्रमाला नालासोपारा विधानसभेचे मा.आमदार क्षितिज ठाकूर यांची खास उपस्थिती लाभली.कुणबी समाजोन्नती संघ, मुंबईचे सरचिटणीस कृष्णा वणे, कुणबी युवा मुंबईचे सरचिटणीस संतोष कांबळे,समाजसेवक कुळये गुरुजी,कुणबी बँकेचे संचालक पी.डी. ठोंबरे, ज्ञानदीप क्लास विरारचे संचालक दीपक भरणकर,माणगावचे कुणबी समाज सेवक प्रकाश दसाळे,समाजसेविका सौ.पालांडे ताई,कुणबी उद्योजक अनंत फिलसे, सुप्रिया ट्रॅव्हल्सचे मालक कुणबी व्यावसायिक मस्कर,कुणबी युवा मुंबईचे शिलेदार मोरे उपस्थित होते.प्रमुख अतिथी म्हणून रक्तदानाला उपस्थिती वि.आ.मा. युवा आमदार क्षितिजदादा ठाकूर, संघटक अजीवजी पाटील,स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत, नगरसेविका सौ.चिरायूताई चौधरी,मीनलताई पाटील,रिटाताई सावरिया,पत्रकार दिपक मांडवकर,विरारचे प्रभोधनयोद्धा आयु.विजय कदम, रिअल इस्टेटचे सल्लागार कुणबी समाज सेवक सावंत, कुणबी युवा मुंबईचे माजी अध्यक्ष अनंत साळवी,मनवेलपाडा सामाजिक संस्थाचे पदाधिकारी गणेश गावडे, परशुराम नाईक, विक्रम चाळके,कोकण नगर चे विनायक शिगवण, कार्यक्रमासाठी निःशुल्क जागा उपलब्ध करून देणाऱ्या सौ. सामंत मॅडम इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

हा भव्य दिव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभागीय शाखा विरारचे सर्व पदाधिकारी,सदस्य, कुणबी युवा विरारचे सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते सदस्य त्याच बरोबर कुणबी महिला मंडळ विरार च्या पदाधिकारी, कार्यकारणी सदस्य याचे मोलाचे योगदान लाभले.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाखेचे सचिव एकनाथ डिंगणकर यांनी केले. कार्यक्रमाला उपस्थित सर्व रक्तदाते,मान्यवर, समाज सेवक,कार्यकर्ते,महिला मंडळ यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# आप तर्फे खोपोली शहरात अनोखे आंदोलन

## नागरिकांच्या समस्या व तक्रारींचे भरवणार प्रदर्शन

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**

आम आदमी पार्टी खोपोली शहरात नेहमीच नागरिकांच्या तक्रारी व समस्यांवर आवाज उठवत असते व त्याबाबत पाठपुरावा करत असते. पक्ष नागरिकांच्या समस्या व तक्रारी निवेदनाच्या मार्फत प्रशासना कडे मांडत असते परंतु नगरपरिषद प्रशासन, महावितरण, तहसीलदार कार्यालय यांच्याकडून नागरिकांच्या तक्रारीची दखल घेतली जात नाही व उत्तरे मिळत नसल्याकारणाने आम आदमी पार्टी तर्फे सदर समस्या




व तक्रारींचे प्रदर्शन गुरुवार दिनांक 05 जून 2025 रोजी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 6.00 पर्यंत खोपोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समोर ठेवण्यात येणार आहे.सदर प्रदर्शनामध्ये नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी व आम आदमी पार्टी तर्फे प्रशासनाकडे करण्यात आलेले पत्र व्यवहार अथवा निवेदने यांचे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे असे खोपोली शहर अध्यक्ष ग्यासुद्दीन खान यांनी सांगितले. नागरिकांनी सार्वजनिक समस्यांबाबत बोलणे आवश्यक आहे व त्याबाबत आवाज उठवणे गरजेचे आहे. शहरामध्ये कुठेही काहीही समस्या असेल तर आम्ही ती समस्या प्रशासनापर्यंत घेऊन जाण्यासाठी तत्पर आहोत. तरी नागरिकांनी न घाबरता प्रशासकीय समस्या आमच्यापर्यंत पोहोचवावे असे आम आदमी पार्टी प्रदेश संघटन सचिव डॉ. पठाण यांनी सांगितले.

# पि एम पी एम एल बस प्रवासांच्या खिशाला कात्री -१जुन पासून भाडेवाढ लागू.......

**दैनिक युवक आधार**
**श्री शिवाजी वाघमारे**
**चिखली पुणे पप्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या पि.एम.पि.एम. एल. प्रवासी सेवेची भाडेवाढ रविवार १जुन २०२५ पासून लागू करण्यात आली आहे नवीन तिकीट दर रचनेनुसार पहिल्या १ते५ किलोमिटर अंतरासाठी आता दहा रुपये प्रवासाला मोजावे लागणार आहेत. पूणे आणि पिंपरी चिंचवड हद्दीत दैनंदिन (दैनिक) पास ४०/-₹ ऐवजी ७०/- रुपयांना घ्यावा लागेल. तसेच पि एम आर डी ए हद्दीत दैनंदिन (दैनिक) पास १२०/-₹ ऐवजी आता १५०/-रुपयांना घ्यावा लागेल. आणि मासिक पास ९००/-₹ ऐवजी आता १५००/- रुपयांना घ्यावा लागेल.

पुणे व पिंपरी चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पि एम आर डी ए हद्दीत अशा दररोजच्या एक हजार सहाशे बस रस्त्यावर धावत आहेत .पि एम पी एम एल गेल्या ११ वर्षांपासून भाडेवाढ करण्यात आली नव्हती. राज्य परिवहन महामंडळ, बेस्ट मुंबई, नागपूर शहर बस सेवा यांनी केलेल्या तिकीट दरवाढीच्या आधारांवर पि एम पी ने नव्याने दरवाढीचा प्रस्ताव सादर करुन , संचालक मंडळाची मान्यता घेतली त्या निर्णयानुसार एक जुनं पासून भाडेवाढ निश्चीत करण्यात आली आहे. या पूर्वी दोन किलो मीटर अंतरासाठी केवळ ५ /-₹ असा तिकीट दर होता आणि आता नवीन तिकीट दर रचनेनुसार पहिल्या दोन किलो मीटर अंतरासाठी १०/-₹ मोजावे लागणार आहेत.१ते३० किमी अंतरासाठी,५किमी अंतराने विविध टप्पे आहेत तर पुढील ३०ते८०किमी अंतरासाठी १०किमी अंतराने विविध ५ टप्पे आहेत अशाप्रकारे एकुण ११ टप्यात तिकीट दर निश्चित करण्यात आले आहेत.

अशा प्रकारे भाडेवाढ करण्यात आली आहे
१) पहिला टप्पा:-५किमीप्रयंत - १०/-₹ तिकीट
२) दुसरा टप्पा:- ५.१किमी ते १० किमी पर्यंत -२०/-₹
३) तिसरा टप्पा :- १०.१किमी ते १५ किमी पर्यंत -३०/-₹
४) चौथा टप्पा :- १५.१किमी ते २०किमी पर्यंत -४०/-₹

# जऊळका पोलीस स्टेशन अंतर्गत. येणाऱ्या खेड्यासह व जऊळक्यात खुलेआम गावठी दारू विक्री जोरात.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

मालेगाव तालुक्यातील जऊळका पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व खेड्यासह व जऊळक्यात ग्रामीण भागामध्ये मागील काही दिवसापासून येथे खुलेआम प्रतिबंधित गावठी व देशी दारूची विक्री होत असल्याची तक्रार सर्वच ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. जऊळका सर्वच बाबतीत अव्वल आहे. तसेच दोन नंबरच्या धंद्यातही युवक व्यसनाधीकडे वळत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. संभाव्य अनुचित घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी यावर नियंत्रण मिळवण्याची मागणी करण्यात आलेली आहे. मालेगाव तालुक्यातील जऊळका चांगली मोठी बाजारपेठ आहे. या ठिकाणी बऱ्याच खेडेगावातील लोक विविध कामासाठी दर दिवशी येत असतात. त्यामुळे या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने पोलिसांसह सर्व संबंधित यंत्रणांकडून



योग्य उपाययोजना होणे आवश्यक आहे परंतु तसे होत नाही. नावालाच बंदी अवैध धंद्याची संधी अवैध धंद्याची कलाच न्यारी जऊळका भागातही सुरू दुकानदारी त्यामध्ये पोलिसांची थेट भागीदारी. अशातला हा प्रकार दिसून येत आहे. अवैध धंद्याची खेळी अनेकांचे गेले बळी. तथापि या ठिकाणी अवैध दारू विक्री सह प्रतिबंधित गुटख्याची सुद्धा खुल्या विक्री होत असल्याची सामान्य जनतेत खमंग चर्चा आहे. या गावठी दारूवाल्यांना व गुटख्या वाल्यांना नेमका कोणाचा आशीर्वाद समजायचे. जऊळका पोलीस स्टेशनचा की वरिष्ठ अधिकाऱ्यांचा असा सवाल उपस्थित होत आहे. अवैध दारू विक्रीमुळे परिसरातील अनेकांचे संसार उध्वस्त झाले असून. अनेकांचे संसार उध्वस्तहोण्याच्या मार्गावर आहेत. ही बाब लक्षात घेत पोलीस प्रशासनासह उत्पादन शुल्क विभाग अन्न व औषध प्रशासनाकडून जऊळका शहरामध्ये व ग्रामीण भागामध्ये ठिकठिकाणी कारवाईची मोहीम राबवणे आवश्यक झाले आहे.

एस पी अनुज तारे साहेब. जउळका पोलीस स्टेशन अंतर्गत या गावांमध्ये मिळते गावठी दारू. पिंपळा. आमखेडा.अमानवाडी हनवत खेडा.दुबळवेल. खडकी.गीव्हा. विशेषत.. जऊळका गावात पोलीस स्टेशन असून सुद्धा गावठी दारू गुटखा वरली मटका जुगार खुलेआम सुरू. ठाणेदार हिवरकर सुस्त नाही घालत गस्त अवैध धंदे मस्त कर्मचारी वसुलीत व्यस्त. या गोष्टींना ठाणेदार हिवरकर यांचा खुलेआम आशीर्वाद.दिसून येत आहे मस्त.

# सेलू येथील ब्राह्मण समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व समाजभूषण पुरस्कार समारंभाचे आयोजन.

दैनिक युवक आधार
सेलू प्रतिनिधी :- महेश राऊत

सेलू येथील श्री भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने आयोजित समाजातील गुणवंत विद्यार्थी सत्कार व समाजभूषण पुरस्कार समारंभाचे आयोजन शुक्रवार दि.06 जून 2025 रोजी सायंकाळी 05 वाजता श्री साई नाट्य मंदिर महेश नगर सेलू येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे चिटणीस प्राचार्य.डॉ.व्ही.के.कोठेकर, प्रमुख पाहुणे म्हणून राज्यसभा खासदार तथा उपाध्यक्ष राष्ट्रीय महिला मोर्चा,पुणे डॉ.मेधा विश्राम कुलकर्णी तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून प्रदेशाध्यक्ष परशुराम हिंदू सेवा संघ तथा प्रदेश उपाध्यक्ष भाजप उद्योग आघाडी,पुणे श्री विश्वजीत देशपांडे यांची उपस्थिती राहणार आहे. समाजभूषण पुरस्कारासाठी सेलू येथील ज्येष्ठ विधिज्ञ तथा शहराचे ग्रामदैवत केशवराज बाबासाहेब महाराजांचे वंशज तसेच श्री.के.बा.शि.प्र.मं.सेलू चे संस्थापक अड.लक्ष्मीकांत मल्हारराव सुभेदार व वालूर येथील सौ.सविता शिवाजीराव पाठक यांची समाजभूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. वरील मान्यवरांच्या उपस्थितीत समाजभूषण पुरस्कार देण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्री.भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात येत आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी समिती सदस्य परिश्रम घेत आहेत.

# निफाड तालुक्यात दि.१ ते दि.३० जून महाराजस्व अभियान, मंडळस्तरावर शिबिरांचे आयोजन

## तहसिलदार विशाल नाईकवाडे यांची माहिती*

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडंगे**

**विंचूर** :- निफाड तालुक्यातील शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांचे महसूल विभागातील विविध कार्यालयांत प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी दि.१ जून ते दि.३० जून दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. त्यानिमित्त तालुक्यात मंडळनिहाय शिबिराचे आयोजन केले आहे, अशी माहिती तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी दिली आहे.

राज्य शासनाच्या महसूल विभागाने अध्यादेश जारी केला आहे. तहसीलस्तरावर एक



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानासंदर्भात निफाड तालुक्यात जून महिन्यात मंडळनिहाय शिबिरे आयोजित केली आहेत. मंडळाधिकारी यांना नेमून दिलेल्या तारखेस मंडळस्तरावर उपस्थित राहून शिबिर होताच, त्याबाबतचा अहवाल फोटोसह तहसील कार्यालयास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**विशाल नाईकवाडे,**
**तहसीलदार, निफाड**

निफाड तालुक्यात 'महाराजस्व अभियान' अंतर्गत निफाड तालुक्यातील १२ गावांमध्ये २०-२५ वर्षांपासून वादग्रस्त असलेले शिवार रस्ते 'महाराजस्व अभियान' अंतर्गत सामोपचाराने मोकळे करण्यात आले. यामध्ये दारणा सावंगी, शिरवाडेवणी ते पालखेड, धारणगाव वीर ते सारोळेथडी, रसलपूर ते कोठूरे, नारायणटेंभी ते कारसुळ, वडाळी नजीक ते पिंप्री, सोनगाव ते सायखेडा, खडकमाळेगाव ते टाकळी, दारणासांगवी आणि पालखेड या गावांचा समावेश आहे. या रस्त्यांच्या उभारणीमुळे गावांच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. महाराजस्व अभियानाच्या अंतर्गत, निफाड तालुक्यातील दोन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी वाळूच्या मोफत पासचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांना त्यांच्या घरकुल बांधणीसाठी आवश्यक असलेल्या वाळूची उपलब्धता सुनिश्चित झाली आहे. महाराजस्व अभियानांतर्गत महसूल अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

ते तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी प्रलंबित असलेल्या फेरफार निकाली काढण्यात येणार आहेत. भूसंपादन केलेल्या अकृषिक परवानगी कमी जात पत्रके तयार करून गाव दप्तर अद्ययावत करणे, जमीन महसूलसंहिता १९६६ च्या कलम ४२ (ब), ४२ (क) आणि ४२ (ड) नुसार समाविष्ट होणाऱ्या जमिनींच्या भोगवटदारांकडून अकृषिक रक्कम आकारणीची रक्कम भरून घेणे आणि त्याअनुषंगाने संबंधितांना सनद देण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार सर्व मिळकत धारकांना देण्याच्या अकृषिक आकारणी मागणीची नोटिसा देणे, त्याची तातडीने कारवाई करावी. गाव नकाशाप्रमाणे अतिक्रमित व बंद केलेले गाडी रस्ते, पाणंद, पांधण, शेतरस्ते, शिवाररस्ते, शेतावर जाण्याचे मार्ग मोकळे करणे तसेच वहिवाटीचे रस्ते मोकळे करणे, त्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ होण्यास मदत होणार आहे. ही मोहीम जिल्ह्यात सर्वत्र राबविण्यात येणार आहे. लोकसेवा हक्क अधिनियम २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी करणे, शैक्षणिक प्रयोजनासाठीचे दाखले व नागरिकांना उपलब्ध करून देणे, अर्जांच्या नोंदी अद्ययावत करणे, मोजणी प्रकरणे निकाली काढणे, ई-पीक पाहणी प्रकल्पाची अंमलबजावणी करणे, महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकालात काढणे, महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी मंडळस्तरावर समाधान शिबिरांचे आयोजन केले आहे.

**मंडळांची नावे व शिबिरांची तारीख**

विंचूर दि.१० जून, रानवड दि.१३ जून, नांदरमध्यमेश्वर दि.९ जून, पिंपळगाव दि.२६ जून, पालखेड दि. ३० जून, ओझर दि.२० जून, लासलगाव दि.१७ जून, निफाड दि.६ जून, चांदोरी दि.२७ जून, देवगाव दि.५ जून, सायखेडा दि.१९ जून.

# हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनतर्फे नवनियुक्त विभागीय आयुक्त मा. जितेंद्रजी पापळकर सर(आयएएस) यांचा सत्कार!

## पुष्पगुच्छ न देता पुस्तक भेट देऊन सत्कार!

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

नवनियुक्त विभागीय आयुक्त मा. श्री.जितेंद्रजी पापळकर सर(आयएएस) यांनी शनिवारी छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त पदाचा पदभार स्विकारल्यानंतर हॅप्पी टू हेल्प फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम सर यांनी आज सोमवारी रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन नवनियुक्त विभागीय आयुक्त मा.श्री.जितेंद्रजी पापळकर सरांची भेट घेतली व फाऊंडेशनच्या परंपरेनुसार पुष्पगुच्छ न देता पुस्तक अणि शाल देऊन सत्कार केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छाही दिल्या. `यावर्षी शिक्षकांच्या बदल्या पारदर्शकपणे व्हावी ही विनंतीही यावेळी करण्यात आली.` मा.श्री.जितेंद्रजी पापळकर सर यांनी यापूर्वीही छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयात 2016 मध्ये महसूल उपायुक्त म्हणून काम पाहिलेले आहे. त्या पदावरून ही ते आयएएस झाले...





# मराठवाडा आवृत्ती

## सिल्लोड तालुका दूध संघाची निवडणूक बिनविरोध चेअरमन पदी देविदास पा. लोखंडे तर व्हाईस चेअरमन पदी सय्यद सत्तार बागवान यांची निवड

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- योगेश पालोदकर

सिल्लोड : सिल्लोड तालुका शेतकरी सहकारी दूध संघाच्या सन 2025-26 ते 2030 - 31 या वर्षासाठी नूतन संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत शिवसेनेचे सर्वच एकूण 14 संचालक बिनविरोध निवडून आले. संचालक मंडळाच्या निवडीनंतर चेअरमन पदासाठी देविदास पा. लोखंडे तर व्हाईस चेअरमनपदी सय्यद सत्तार बागवान यांचा प्रत्येकी एकच अर्ज प्राप्त झाल्याने तालुका दूध संघाच्या चेअरमन पदी देविदास पा. लोखंडे, व्हाईस चेअरमनपदी सय्यद सत्तार यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीबद्दल आमदार अब्दूल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय सेना भवन येथे आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते नवनिर्वाचित चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालकांचा सत्कार करण्यात आला.

यាप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, माजी पं. स.सदस्य शेख सलीम, नॅशनल सह. सूतगिरणीचे संचालक विशाल जाधव, तालुका दूध संघाचे नवनिर्वाचित चेअरमन देविदास पा. लोखंडे, व्हाईस चेअरमन सय्यद सत्तार, संचालक राहुल गव्हाणे, समाधान भुईगळ, शेख अब्दुल रहीम ,दत्ता कुडके, साहेबराव गोराडे ,संजय राकडे, महादु दुधे, नय्युम पटेल, श्रीमती शबाना खान, श्रीमती राधिका कुदळ, ईश्वर जाधव ,जीवनसिंग जाधव आदींची उपस्थिती होती.




## खाजगी सावकार विरोधात आवाज उठवणार मा.आ.भीमरावजी धोंडे

### खासगी सावकार पाचपट रक्कम वसुल करुन अभद्र बोलतात ; त्याचाच संजय कांकारिया हे बळी ठरले.

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :**
**मारुती सत्रे**

आष्टी,पाटोदा,शिरुर तालुक्यात अवैध सावकारीमुळे अनेक कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. अनेकांना घरदार,गाव सोडुन पळुन जावे लागले आहे.अनेक कुटुंब उघड्यावर आली आहेत. अनेकांनी आत्महत्या करुन आपले जीवन संपविले आहे.या अवैध सावकारांना कोणाची भीती राहिलेली नाही.त्यामुळे अवैध सावकारी बंद करण्यासाठी आपण आवाज उठवणार आहोत.जे लोक खासगी सावकारीला व पाचपट व्याजाला त्रासलेले आहेत त्यांनी आपल्याकडे नावे व पुरावे द्यावेत आपण या प्रकरणी बीड जिल्हा पोलीस प्रमुखांकडे तक्रार करणार आहोत वेळपडल्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेणार आहोत. खासगी सावकार पाचपट रक्कम वसुल करुन अभद्र बोलुन अपमानास्पद वागणुक देतात. त्याचाच पाटोदा येथीला आमचे ३० वर्षापासुन कट्टर कार्यकर्ते असलेले संजय कांकारिया हे बळी ठरले म्हणून अवैध सावकारी बंद करण्यासाठी आपण आवाज उठवणार आहोत. कांकारिया आत्महत्या प्रकरणातील सुसाईट नोटमधील दोन आरोपी फरार आहेत त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी माजी आ.भीमराव धोंडे यांनी केली आहे. आष्टी येथील भगवान महाविद्यालयामध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. माजी आ. धोंडे पुढे म्हणाले की,आष्टी शहरामध्ये तरुण युवकांची पिढी या धंद्याकडे वळली आहे ते गरजू व्यक्तींना पैसे देतात आणि कित्येक पटीने वसुली करतात.व्याजावर व्याज आकारून कर्जदाराला प्रचंड अडचणीत आणतात त्याच्या या असहाय्य परिस्थितीचा गैरफायदा घेऊन आष्टीतले खाजगी सावकार गब्बर झाले आहेत.पाटोदा येथील संजय कांकरिया हा तरूण व्यापारी अवैध सावकारकीचा बळी ठरले आहेत.अवैध सावकार पाचपटीने पैसे घेऊनही त्यांचे समाधान होत नाही अवैध आणि बेकायदेशीर पद्धतीने चाललेल्या सावकारी विरुद्ध कर्जदारांनी न्याय मागावा पोलिसांकडे तक्रार करावी, सहाय्यक निबंध सहकारी संस्था यांच्याकडे तक्रार करावी. याकामी त्यांना सहकार्य मिळाले नाही तर त्यांनी आपणाकडे यावे असे जाहीर आवाहन माजी आ.धोंडे यांनी यावेळी केले.आपण जिल्हा पोलीस अधीक्षक बीड आणि वेळप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जाऊन या अवैध सावकारी विरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी अशी विनंती करणार आहोत असे माजी आ.भीमराव धोंडे सांगितले.



## मूर्ती तालुका घनसावंगी गट नंबर २६९ मधील ३ एकर अज्ञात व्यक्तीने पेटवून दिला.

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय संपादक**
**:प्राचार्य जगन्नाथ रासवे**

शिवाजी त्रिंबकराव थोरात राहणार मूर्ती गट नंबर २६९ यांच्या मालकीच्या शेतातील ३ एकर अज्ञात व्यक्तीने आज दिनांक 2जून 2025 रोजी पेटवून दिला. आता तोंडाशी आलेल्या उसाच्या पिकाचे नुकसान झाले आहे. तरी प्रशासनाने या शेतकऱ्याच्या शेतावरती जाऊन पंचनामे करून योग्य ती मदत या शेतकऱ्याला मिळवून द्यावी अशी मागणी शिवाजी त्रिंबकराव थोरात यांनी केली असून असे कृत्य करणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हे दाखल करून त्याला कठोरातील कठोर शिक्षा मिळावी व या व्यक्तीचा शोध पोलीस प्रशासनाने घ्यावा असे मनोगत समस्त पंचकोशीतून होत आहे.



## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्म महोत्सव

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**


**नांदेड** - बिलोली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्म महोत्सवाच्या निमित्ताने मौजे बिजूर तालुका बिलोली येथील महादेव मंदिरात भाजपाच्या वतीने मंदिर परिसर स्वच्छता व महाआरतीचे आयोजन लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 वी जयंती केंद्र व राज्य सरकारच्या वतीने व तसेच भारतीय जनता पार्टीच्या वतीने संपूर्ण भारतभरात फार मोठ्या प्रमाणात साजरा केली जात आहे. त्याचेच औचित्य साधून, बिलोली तालुका भाजपा पूर्व ग्रामीणचे मंडळाध्यक्ष, श्री मारोती गंगाधर राहिरे यांनी आपल्या मंडळातील मौजे बिजूर या गावी तालुक्यातील विविध मान्यवरांच्या व गावकऱ्यांच्या उपस्थितीत प्राचीन शिवमंदिर परिसर स्वच्छता व भव्य आरतीचे आयोजन करून, होळकर जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या व महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करून, सदर कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. महादेव मंदिर संपूर्ण परिसर स्वच्छता व सर्व मान्यवरांच्या हस्ते महादेवाची आरती करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या जयंतीस सुरुवात करण्यात आली. त्याप्रसंगी भाजपाचे देगलूर बिलोलीचे आमदार जितेशभाऊ अंतापुरकर, भाजपा जिल्हा सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड व जिल्हा सरचिटणीस



माणिकराव लोहगावे, मंडळाध्यक्ष मारोती राहिरे यांनी आपल्या मनोगतामधून अहिल्यादेवींच्या विचारावर प्रकाश टाकला. संपूर्ण मंडळांमधून भाजपचे 200 च्या वरून कार्यकर्ते व प्रमुख पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख उपस्थित होते. सदर कार्यक्रमास शंकरराव परसुरे, राजेंद्र रेड्डी लोहगावकर, शंकरराव काळे, नागनाथ पाटील माचनूरकर, शिवराज पाटील बोधने, संभाजीराव शेळके, गोविंदराव पाटील बोरगावकर, संदीप पाटील रामपुरे, साहेबराव अंजनीकर, प्रकाश भंडारे, मारोती पाटील सावळे, संजय पाटील भोसले, वैभव पाटील भोसले, राजू स्वामी बडूरकर, आनंद महाराज बोरगावकर, शिवलिंगराव ईबिते सर, सरपंच तिरुपती डाकोरे, आकाश पाटील कोकणे, विठ्ठल माने, शिवाजी पा खिसे, बालाजी पाटील शिनगारे, पो. पाटील शिवराज सिनगारे, नागनाथ पाटील शिनगारे, गोविंद पाटील शिनगारे, बालाजी कुरनापल्ले, भाऊसाहेब बनबरे, दिगंबरराव हजारे, संतोष पाटील भक्तापुरे, चंद्रकांत तलवारे, मारोती वानोळे, गोविंद पेटेकर, सायबु येतोंडे, ब्रह्मानंद कांबळे, उत्तम बत्तलवाड, बळीराम बंडगर, संजय हलबुर्गे, मारोती कोलमवार, सूर्यकांत चिगळे, बाबुराव कुंटुरे, हनमंत पाटील शिनगारे, मोहन सिनगारे सर, कैलास बंडगर, जयसिंग सुरनर, रावसाहेब शिनगारे, रुखमाजी होरके, श्रीनिवास अकुलवार, माधवराव पाटील, बाबुराव पाटील चिंचोले, रवी चिमणापुरे, दिगंबराव विभूते, बालाजी शिरगिरे, रामकिशन भत्ते, मलबा देवाले, सतीश बोगुलवार, वरिष्ठ पत्रकार व्यंकटराव शिनगारे, तालुक्यातील व परिसरातील इतर कार्यकर्ते व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन श्री बिलोली मंडळ अध्यक्ष मारोती राहीरे, बिजूर येथील शक्ती केंद्रप्रमुख नागनाथ पाटील शिनगारे, बूथ प्रमुख गोविंद पाटील शिनगारे, कैलास बंडगर यांनी केले.

## सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या यादीत एलआयसी अव्वल स्थानी

### चौथ्या तिमाहीत मिळवला १९,०१३ कोटींचा विक्रमी नफा




**नवी दिल्ली :** सार्वजनिक क्षेत्रातील भारतीय जीवन विमा महामंडळ (एलआयसी) मार्च तिमाहीत सार्वजनिक उपक्रमांमध्ये १९,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त नफा मिळवून सर्वाधिक नफा कमावणारी कंपनी ठरली आहे. गेल्या आठवड्यात, एलआयसीने जानेवारी-मार्च आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ३८ टक्क्यांनी वाढ करून १९,०१३ कोटी रुपयांचा विक्रमी नफा मिळला, जो मागील वर्षीच्या याच तिमाहीत १३,७६३ कोटी रुपयांचा होता.

देशातील सर्वात मोठी विमा कंपनी स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) चौथ्या तिमाहीत १८,६४३ कोटी रुपयांचा नफा मिळवला. तथापि, वार्षिक नफ्याच्या बाबतीत एसबीआय एलआयसीपेक्षा पुढे होती कारण तिने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ७०,९०१ कोटी रुपये कमावले होते, तर एलआयसीने ४८,१५१ कोटी रुपये कमावले होते.

अन्य सार्वजनिक उपक्रमांमध्ये, कोल इंडियाने या तिमाहीत ९,६०४ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला, त्यानंतर पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन (पीएफसी) ने ८,३५८ कोटी रुपये आणि एनटीपीसीने ७,८९७ कोटी रुपये कमावले, असे शेअर बाजाराकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार दिसून येते.

तेल क्षेत्रात, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन (आयओसी)ने चौथ्या तिमाहीत ७,२६५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला, त्यानंतर ओएनजीसीने ६,४४८ कोटी रुपये नफा मिळवला. आरईसी लिमिटेडसारख्या इतर केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनी (सीपीएसई) ४,३०४ कोटी रुपये, पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (४,१४३ कोटी रुपये) आणि स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड (१,२५१ कोटी रुपये) निव्वळ नफा कमावला.

एलआयसीच्या दमदार कामगिरीनंतर दुसऱ्या दिवशी २८ मे रोजी बीएसईवर त्यांचे शेअर्स ८ टक्क्यांनी वाढून ९४२.५५ रुपयांवर स्थिरावले. कंपनीचे बाजारमूल्य ४५,२२३.७४ कोटींनी वाढून ५,९६,१६२.६६ कोटींवर पोहोचले. एलआयसीचे व्यवस्थापनाखालील मालमत्ता (एयूएम) ३१ मार्च २०२५ रोजी ५४,५२,२९७ कोटी रुपयांवर पोहोचली, जी ३१ मार्च २०२४ रोजी ५१,२१,८८७ कोटी रुपयांवर होती, जी मागील वर्षीच्या तुलनेत ६.४५ टक्क्यांनी वाढली आहे.

## कृषी विज्ञान केंद्र, वाशिमतर्फे विकसित कृषी संकल्प अभियानाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**.. रिसोड प्रतिनिधी**
**. रणजीत सिंह ठाकुर**

शास्त्रज्ञांचे आवाहन – शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी बीज प्रक्रिया, सुधारित वाण आणि सरी-वरंबा पद्धतीचा अवलंब करावा* कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने विकसित कृषी संकल्प अभियान अंतर्गत सोमवार, २ जून २०२५ रोजी मौजे पळसखेड, खडकी सदार व लिंगा कोतवाल या गावांतील ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास पळसखेडचे उपसरपंच श्री. संदीप पुंजाजी खरात, तंटामुक्ती अध्यक्ष श्री. माणिकराव किसनराव खरात, खडकी सदारचे सरपंच श्री. शंकरभाऊ सुरुशे, प्रगतशील शेतकरी श्री. संजीव सदार, लिंगा कोतवालचे सरपंच श्री. राहुल डोंगरे, बाजार समिती सदस्य श्री. राजेंद्रभैया देशमुख, पोलीस पाटील श्री. पुरुषोत्तम देशमुख, तसेच राष्ट्रीय लिंबू वर्गीय फळ संशोधन केंद्र, नागपूर येथील शास्त्रज्ञ डॉ. डी. टी. मेश्राम व डॉ. एस. एस. रॉय, पशुविज्ञान महाविद्यालय, पी.डी. के.व्ही. अकोला येथील सहायक प्राध्यापक डॉ. गजानन लांडे व डॉ. मंगेश वैध, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. एस. के. देशमुख व श्री. आर. एस. डवरे, तसेच कृषी विभागाचे कृषी सहायक श्री. नितीन मोरे व श्री. अनंत प्रकाशराव देशमुख उपस्थित होते. डॉ. एस. के. देशमुख यांनी कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत विकसित कृषी संकल्प अभियानाचे महत्त्व विषद केले. त्यांनी माती परीक्षण, जमिनीच्या आरोग्याचे संरक्षण, तसेच नैसर्गिक व शाश्वत शेतीचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. डॉ. डी. टी. मेश्राम यांनी लिंबूवर्गीय फळझाडांची शास्त्रोक्त लागवड, फळबाग व्यवस्थापन व जातीवंत कलमांची निवड व लागवडीचे फायदे यावर मार्गदर्शन केले.

डॉ. गजानन लांडे यांनी हळद पिकाचे व्यवस्थापन, त्यातील हुमणी अळीचे नियंत्रण, तसेच बेणे प्रक्रिया याबाबत सखोल माहिती दिली. डॉ. मंगेश वैध यांनी जनावरांचे लसीकरण, वैरण व्यवस्थापन, पशुखाद्य निर्मिती, गोठ्याची स्वच्छता आणि पशुसंवर्धन विभागाच्या योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली.

श्री. आर. एस. डवरे यांनी शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी बीजप्रक्रियेचे महत्त्व, एकात्मिक कीड व्यवस्थापन, जैविक निविष्ठांचा वापर, तसेच ड्रोन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पिकांचे संरक्षण याविषयी मार्गदर्शन केले.

कृषी सहायक श्री. नितीन मोरे आणि श्री. अनंत देशमुख यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली. कार्यक्रमानंतर लिंगा कोतवाल येथील प्रगतशील शेतकरी श्री. सुरेशराव बाबाराव देशमुख यांच्या संत्रा बागेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. के. देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. एस. आर. बावस्कर यांनी मानले.



## " सेवानिवृत्तांची गाठभेट. "

हूरहूर संपली, प्रतीक्षा सरली,
दिवस उगवला, भेटीचा,
जिवाच्या जिवलगांशी,
पुन्हा एकवार यथेच्छ,
हितगुज करण्याचा,
जुन्या आठवणी, चाळवण्याचा,
मनसोक्त गप्पा मारण्याचा. !

असे ते मैत्र मनाचं ,
नातं स्वतःचं,
मन मोकळं करण्याचं,
अन सुख, दुःखात भागीदार,
होण्याचं. !

एकदुजा सहकार्याने फुलला,
काळ उमेदीचा सरला,
करवदलो, शब्दाशब्दी झाली,
खेकसलो,
पण दुपारी जेवणाला,
एका डब्यात, खायला बसलो,
निवृत्तीचा भेसूर, चेहरा दिसला,
ताटातुटीचा घाव, वर्मी बसला,
पण नियतीचा खेळ,
कुणाला टळला ?


सेवा निवृत्ती होवून काळ,
बराच लोटलाय,
ठरवलं कैकदा, भेटायचं,
पण संसाराच्या धबडग्यात,
कायम फिसकटायचं, !

घेवून मनावर,
सहकाऱ्यांनी शिरावर,
गोतावळा जमवण्याचा, घाट घातला,
क्षण पकडला, दिवस ठरवला,
अखेर पळ तो, आज उगवला. !
चला , भेटूयात,
क्षण मिलनाचे, मनात भरवूयात,
झालंय वय, गात्र थकलीय,
कुणास ठाऊक,
पुन्हा भेट होते की नाय. !

पुन्हा भेट, होते की नाय. !!

पुन्हा भेट, होते की नाय. !!!

अरुण निकम.



## व्यावसायिक एलपीजी किमतीत २४ रुपयांची कपात

**नवी दिल्ली :** रविवारी जेट इंधनाच्या किमतीत ३ टक्के कपात करण्यात आली. आंतरराष्ट्रीय बाजारात किमती कमी झाल्यानंतर ही सलग तिसरी मासिक कपात आहे. व्यावसायिक एलपीजीच्या १९ किलो सिलिंडरच्या किमतीत २४ रुपये कपात करण्यात आली. व्यावसायिक एलपीजीची किंमत आता राष्ट्रीय राजधानीत १,७२३.५० रुपये आणि मुंबईत १,६४७.५० रुपये आहे.

### एटीएफ दरात ३ टक्के कपात



देशातील सर्वात व्यस्त विमानतळांपैकी एक असलेल्या राष्ट्रीय राजधानीत विमान टर्बाइन इंधन (एटीएफ) ची किंमत २,४१४.२५ रुपये प्रति किलोलिटर किंवा २.८२ टक्के कमी होऊन ८३,०७२.५५ रुपये प्रति किलोलिटर झाली, तर मुंबईत एटीएफची किंमत ७९,८५५.५९ रुपयांवरून ७७,६०२.७३ रुपये प्रति किलोलिटर करण्यात आली, असे सरकारी मालकीच्या इंधन विक्रेत्यांनी सांगितले.

## विदेशी संस्थांची मेमध्ये १९,८६० कोटींची गुंतवणूक

**नवी दिल्ली :** अनुकूल जागतिक आर्थिक निर्देशक आणि मजबूत स्थानिक पायाभूत सुविधांमुळे मे महिन्यात विदेशी गुंतवणूकदारांनी १९,८६० कोटी रुपयांची गुंतवणूक केली. एप्रिलमध्ये ४,२२३ कोटी रुपयांची निव्वळ गुंतवणूक झाल्यानंतर ही सकारात्मक गती दिसून आली आहे, असे डिपॉझिटरीजच्या आकडेवारीवरून दिसून आले आहे.

यापूर्वी, परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी (एफपीआय) मार्चमध्ये ३,९७३ कोटी रुपये, फेब्रुवारीमध्ये ३४,५७४ कोटी रुपये आणि जानेवारीमध्ये ७८,०२७ कोटी रुपये काढून घेतले होते.